# सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
# नगररचना विभाग

---

## विषय : KRA व KPI संबंधित PPT  बाबत.

# नगररचना विभागाकडील कामकाजाबाबतचा तपशिल

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका दिनांक : ०९.०२.१९९८ रोजी स्थापन झाली असून महानगरपालिकेचे एकूण क्षेत्र ११२.०० चौ. किलोमीटर इतके आहे. महानगरपालिकेची सन २०११च्या जनगणनेनुसार ची लोकसंख्या ५.१३ लक्ष इतकी आहे. सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेचे नगररचना विभाग, सांगली व नगररचना विभाग मिरज असे दोन स्वतंत्र कार्यालये आहेत. मुख्य कार्यालय, सांगली येथे आहे. महापालिकेच्या ४ प्रभाग समिती कार्यालयानुसार प्रभाग समिती क्र. १ व २ चे कामकाज सांगली विभागाकडून व प्रभाग समिती क्र. ३ व ४ च्या कार्यक्षेत्रातील कामकाज मिरज विभागाकडून केले जाते.नगररचना विभागाकडून प्रामुख्याने खालील प्रकारची कामे केली जातात.

# विकास योजना अंमलबजावणी

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेचा विकास योजना आराखडा व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे तरतूदीनुसार मा. शासनाने दि. ०४.०४.२०१२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे भागशः मंजूर केलेला आहे. तसेच ३.३.२०१६ बाबत वगळलेल्या विकास योजनेची अधिसूचना मंजूर झाली आहे.

- आरक्षणातील जागेचे भूसंपादन प्रस्ताव :

मंजूर विकास योजना आराखड्यामध्ये विविध प्रकारची आरक्षणे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. त्यामधील गरजेनुसार आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतूदीचा अवलंब करून भूसंपादन/खाजगी वाटाघाटी/TDR द्वारे जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही नगररचना विभागाकडून केली जाते.

## ➢ रस्ते रूंदीकरण भूसंपादन प्रस्ताव :

महापालिका क्षेत्राच्या विकास योजना आराखड्यामधील नियोजीत १००, ८०, ६०, ४० फुट रस्ते प्रस्तावित केलेले आहेत असे रस्ते गरजेनुसार प्राधान्याने संपादन करून घेणे आवश्यक असते. मंजूर विकास योजना आराखड्यामधील उक्त रस्ते गरजेनुसार नगररचना विभागाकडून खाजगी वाटाघाटीद्वारे जमीन मालकांकडून संपादन करून घेऊन त्यांना योग्य ती नुकसान भरपाई शासन नियमानुसार देऊन रस्ते संपादन करून घेण्याची कार्यवाही केली जाते.

# महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४४ अन्वये परवानगी

मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतूदीनुसार त्याची तांत्रिक छाननी करून विकास विषयक परवाने अ) बांधकाम परवाना, ब) जोते दाखला, क) परिपूर्ती प्रमाणपत्र, ड) रेखांकन मंजूरी, इ) प्लॉट उपविभागणी व एकत्रीकरण इ. विकास विषयक परवानगी देण्याची कामे नगररचना विभागाकडून कामे केली जातात.

# नागरिकांना विकास परवानगी करिता आवश्यक असणारी कागदपत्रे

१) स्थानदर्शक नकाशा (Location Plan)

२) संबंधीत जागेचा नकाशा

३) रेखांकन नकाशा

४) इमारतीचे सविस्तर नकाशे

५) विकासाबद्दलची फॉर्ममधील माहिती

६) मालकीहक्काची कागदपत्रे (मुळ प्रत ३ महिन्याचे आतील)

७) संबंधीत जागेचा हद्दीबाबतचा मुळ मोजणी नकाशा

८) महापालिकेचे टॅक्स देणे नसलेबाबतचे प्रमाणपत्र / नाहरकत दाखला

९) परवानाधारक आर्किटेक्ट / इंजिनिअर यांचे कामाच्या देखरेखीबाबतचे प्रमाणपत्र

# महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणी वाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ व सुधारित १२.३.२०२१

दिनांक ३१. १२.२०२० पूर्वी उपविभागणी करण्यात आलेले मोकळे भूखंड /अनाधिकृत बांधकामे गुंठेवारी अधिनियमान्वये अनाधिकृत प्रशम शुल्क आकारणी करून नियमितीकरण करण्याची कार्यवाही करण्याची कार्यवाही केली जाते.

गुंठेवारी विकास निगमाधीन करणेकामी गुंठेवारी कायद्याशी व विकास योजनेशी सुसंगत मुद्देसूद मार्गदर्शिका ( SOP ) मा. आयुक्तसो यांच्यामान्येतेने करण्यात आलेली आहे. त्यानुसार कार्यपद्धतीचा अवलब करून गुंठेवारी प्रमाणपत्र व नकाशास मंजुरी देण्यात येते.

# इतर कार्यालयीन कामकाज

१) दैनंदिन प्राप्त होणारे तक्रार अर्ज २) लोकशाही दिन ३) माहिती अधिकार ४) तारांकीत प्रश्न ५) शासकीय संदर्भ ६) मा. लोकायुक्त संदर्भ ७) महापालिकेच्या अन्य विभागकडून प्राप्त होणाऱ्या प्रकरणावर विकास योजनेचे अभिप्राय देणे ८) व्यवसाय ना हरकत अभिप्राय ९) झोन दाखले १०) भाग नकाशे ११) मंजूर नकाशाच्या नक्कला देणे इत्यादी.

# नगररचना विभाग
## माहे ०१/०४/२०२३ ते दिनांक ३१/०३/२०२४ अखेर चा बांधकाम परवाना संख्या व जमा शुल्क अहवाल

| अ.क्र | बांधकाम परवाना संख्या | एकूण जमा विकास शुल्क |
|---|---|---|
| १ | २६८२ | ४६,२३,८५,८९५/- |
| एकूण | २६८२ | ४६,२३,८५,८९५/- |

## कर्मचारी संख्या :

## नगररचना विभागाकडे खालीलप्रमाणे अधिकारी /कर्मचारी यांची पदे मंजूर आहेत.

| अ क्र | पदनाम | मंजूर पदे | | कार्यरत पदे | | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शासकीय | महानगरपालिका | शासकीय | महानगरपालिका | | |
| १ | सहाय्यक संचालक, नगररचना | १ | .... | .... | ... | १ | १ |
| २ | नगररचनाकार | २ | २ | १ | १ | २ | २ |
| ३ | सहा. नगररचनाकार | ५ | ... | .... | .. | .... | ... |
| ४ | शाखा अभियंता | .... | ६ | .... | ... | ..... | ६ |
| ५ | क. स्थापत्य अभियंता | .... | ४ | ... | २ | २ | २ |
| ६ | आरेखक | .... | ५ | .... | १ | १ | ३ |
| ७ | टेसर | .... | ५ | ... | १ | १ | ४ |
| ८ | अधिक्षक | .... | २ | ..... | ..... | ..... | २ |

| अ. क्र. | पदनाम | मंजूर पदे | | कार्यरत पदे | | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शासकीय | महानगरपालिका | शासकीय | महानगरपालिका | | |
| ९ | वरिष्ठ लिपिक | .... | ४ | ..... | २ | २ | २ |
| १० | कनिष्ठ लिपिक | ... | १० | .... | ०६ | ४ | ४ |
| ११ | वरिष्ठ लिपिक लेखा | ... | १ | ... | ... | ... | ... |
| १२ | दप्तरबंद | ... | ..... | .... | ..... | ..... | ..... |
| १३ | लेखा लिपिक | .... | २ | ... | ... | ... | २ |
| १४ | शिपाई | ..... | २ | ... | २ | २ | .... |
| -- | एकूण | ०८ | ४३ | १ | १५ | १५ | २८ |

# सद्या नगररचना विभागाकडे कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | नांव | पदनाम |
| --- | --- | --- |
| १ | श्रीमती मुजम्मिल अ.मुल्ला | सहाय्यक संचालक , नगररचना |
| २ | श्रीमती निर्मला देवकते | नगररचनाकार |
| ३ | श्री. राजेद्र काकडे | नगररचनाकार |
| ४ | श्री. शामराव गेजगे | आरेखक |
| ५ | श्री. आण्णासाहेब मगदूम | क.शाखा अभियंता |
| ६ | श्री. यासीन मंगळवारे | क.शाखा अभियंता |

| अ. क्र | नांव | पदनाम |
|---|---|---|
| ७ | श्री. शहाबाज शेख | क.शाखा अभियंता |
| ८ | सौ.कोमल पाटील | सिस्टीम सपोर्ट इंजि. |
| ९ | श्री. सचिन पाटील | वरिष्ठ लिपिक |
| १० | श्री. चेतन हडदरे | कनिष्ठ लिपिक |
| ११ | श्री. विजय कदम | कनिष्ठ लिपिक |
| १२ | श्री. काशिनाथ पाटील | कनिष्ठ लिपिक |
| १३ | श्री. महादेव पाटील | समन्वयक |
| १४ | श्री. प्रसन्ना भोसले | संगणक चालक |
| १५ | श्री. श्रीकांत आवटी | कनिष्ठ लिपिक |

| अ. क्र | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १६ | श्री. भालचंद्र कांबळे | शिपाई |
| | मिरज | |
| १ | श्री.वैभव वाघमारे | प्र.नगररचनाकार |
| २ | श्री. संजय कांबळे | अनुरेखक |
| ३ | सौ. पंकजा कोरे | शाखा अभियंता |
| ४ | श्री. रविंद्र भिंगारदिवे | क.शाखा अभियंता |
| ५ | श्री. अभिजित मोरे | क.शाखा अभियंता |
| ६ | श्री. बाळासाहेब कोळेकर | कनिष्ठ लिपिक |
| ७ | श्री. सागर जाधव | कनिष्ठ लिपिक |

| अ. क्र | नांव | पदनाम |
|---|---|---|
| ८ | श्री. गजानन नरगुदे | संगणक चालक |
| ९ | श्रीमती वर्षा भोकरे | शिपाई |
| १० | श्री. इमरान बारगीर | शिपाई |
| ११ | श्री. साबीर भंडारी | शिपाई |
| | | |
| | कुपवाड | |
| **२** | श्री. संजय कांबळे | अनुरेखक |
| **३** | श्री. आझम जमादार | क.शाखा अभियंता |
| **४** | श्रीमती. मुमताज तांबोळी | कनिष्ठ लिपिक |
| ५ | गोपाळ पवार | शिपाई |
| ६ | सागर कोळी | शिपाई |

# विविध उपक्रम व शासकीय योजना :

**नगररचना विभागाकडून विविध कामे हाती घेण्यात आलेली आहेत.**

१. सांगली स. नं. ५०७ पैकी या जमिनीतील दफनभूमी भूसंपादन = २ हे. २१ आर आरक्षणाचे क्षेत्र आहे भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. ९०% काम पूर्ण झाले आहे. मा. जिल्हाधिकारीसो सांगली कार्यालय यांचेकडून मा.विभागीय आयुक्त पुणे यांचेकडे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविला आहे.

२. सांगलीवाडी येथील ३० आर क्षेत्र STP करिता (मलनि: सारण प्रक्रिया प्रकल्प ) मा. जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडून भूसंपादन करून महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे. त्याप्रमाणे STP चे काम जलनि: सारण विभागाकडून सुरु आहे.

३. सांगलीवाडी येथील आरक्षण भाजी मंडई, सार्वजनिक शौचालय, पार्किंग एकत्रित क्षेत्र ४५०० चौ. मी. व विकास योजना रस्ता ४८०० असे एकूण ९३०० चौ. मी. क्षेत्र खाजगी वाटाघाटी द्वारे ताब्यात घेतले आहे.

४. मिरज येथील स. नं. ५०पैकी क्षेत्र १५१० क्षेत्रातील खेळाच्या मैदानाचे क्षेत्र टीडीआर मार्फत ताब्यात घेण्यात आलेले आहे.

६. कुपवाड साठी भुयारी गटार योजना करीता स. नं. १५१/१पै, कुंभार मळा येथील १ हे.१५ आर ही आरक्षित जागा कुपवाड येथील कुभार मळा ड्रेनेज योजना भूसंपादन करिता कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

७. मा. शासनाच्या आदेशान्वये महानगरपालिकेचे बांधकाम परवाने, रेखांकन मंजुरी, परिपूर्ती प्रमाणपत्र इ. विकास विषयक मंजुरीचे परवाने सन २०२२ पासून ऑनलाईन मंजुरीचे काम सुरु आहे. तसेच मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार आरक्षणाखालील जागा तसेच विकास योजना रस्ता व रस्ता रुंदीकरणाने बाधित क्षेत्र हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) द्वारे ताब्यात घेणे करीताचे प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने मंजूरी देण्यात येत आहेत तसेच ऑनलाईन Accommodation Reservation (A.R.) आणि Reservation Credit Certificate ( R.C.C.) मंजुरी बाबतची प्रक्रिया सुरु आहे.

# Thank you